पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **१४**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२७/०२/२०२०** वेळ - दुपारी २**.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक २७/०२/२०२० रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा सहा.आयुक्त, मा.जागडे- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) बाळंतविडा संच पुरविणेबाबत.- मा.भिमाबाई फुगे , मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव.
विषय क्र.२) पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेच्या प्रशिक्षण संदर्भात मान्यता देणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.अश्विनी चिंचवडे

मा.महिला व बाल कल्याण समिती दिनांक – २७/०२/२०२० रोजीची पाक्षीक सभा (कार्यपत्रिका क्रमांक १४) गुरुवार दिनांक - १२/०३/२०२० रोजी दु.२.३० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** गुरुवार दि.१२/०३/२०२० रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १४

**सभावृत्तांत**

( दिनांक २७/०२/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक - १२/०३/२०२० वेळ - दुपारी २.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक २७/०२/२०२० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक १२/०३/२०२० रोजी दुपारी २.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.पवळे सुमनताई मधुकर
४. मा.कदम निकीता अर्जुन
५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.जागडे- उपनगरसचिव,मा.ऐवले- समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे- सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **२३/०१/२०२० व ०३/०२/२०२०** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ०१

दिनांक – १२/०३/२०२०

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा. अश्विनी चिंचवडे-पाटील

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे ,मा.अश्विनी चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव –

मा.भिमाबाई फुगे ,मा. अश्विनी चिंचवडे-पाटील यांनी प्रस्तावित केलेनुसार स्पर्श ग्रुप सेवाभावी संस्था,पिंपळे गुरव,पुणे-६१ या संस्थेने महानगरपालिकेच्या दवाखान्यांसाठी आवश्यक असणारे बाळंतविडा संच पुरवठा करण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केलेले आहे.

| अ.क्र. | तपशिल | नग | दर र.रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | फ्रॉक बेबी | १ नग | ८५/- | ८५/- |
| २ | लंगोट बेबी | ६ नग | १६/- | ९६/- |
| ३ | दुपटे | २ नग | ७०/- | १४०/- |
| ४ | झबला | २ नग | २९/- | ५८/- |
| ५ | स्वेटर/सॉक्स | १ नग | १४५/- | १४५/- |
| ६ | टोपड / कॅप | २ नग | १८/- | ३६/- |
| ७ | चादर/ब्लँकेट | १ नग | ७५/- | ७५/- |
| | | | एकूण र.रु. | ६३५/- |

उपरोक्त दरानुसार स्पर्श ग्रुप सेवाभावी संस्था, पिंपळे गुरव यांचेकडून महानगरपालिकेच्या दवाखान्यांसाठी आवश्यक बाळंतविडा संच खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक - ०२

दिनांक – १२/०३/२०२०

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा. सुजाता पालांडे

संदर्भ : मा.सुजाता पालांडे , मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

मा.सुजाता पालांडे , मा.भिमाबाई फुगे यांनी प्रस्तावित केलेनुसार " पंडित दिनदयाल उपाध्याय - महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम योजना हि मे.ऊँ ग्रामणै इन्स्टिटयूट फॉर एजुकेशनल एक्सलन्स यांचेमार्फत सन २०१९-२० ते २०२०-२१ या कालावधीसाठी यांचेमार्फत ड क्षेत्रिय कार्यालयाच्या परिसरात र.रु. १ कोटी पर्यंत खर्चाच्या सोबत नमुद केलेल्या उद्योजकता विकास या सेक्टरमधील ८ अभ्यासक्रमासमोर नमुद केलेल्या दरानुसार सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीसाठी प्रशिक्षण देणेस व र.रु.१ कोटी खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१४८अ /२०२०
दिनांक : १२/०३/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(विषय क्रमांक २ शी सलग्न)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील महिला, युवती व युवकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

| | सेक्टर | कौशल्य विकास कार्यक्रम | पात्रता | कालावधी | प्रती लाभार्थी प्रत्यक्ष शुल्क | प्रशिक्षण शुल्कावर GST १८% | GST सह एकूण प्रशिक्षण शुल्क | मनपा स्तरावर मंजूर म्हणजेच एकूण रक्कमेच्या ९०% होणारी रक्कम | प्रशिक्षणाचे फलित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँकिंग व अकौंटिंग | अकौंटिंग | पदवीधर | ४ महीने ( ४५० तास ) (२ महीने क्लासरुम ट्रेनिंग २ महीने ऑनजॉब ट्रेनिंग ) | १६५३८ | २९७७ | १९५१५ | १७५६३ | या कोर्सला प्रवेश घेतलेल्या उमेदवाराना रोजगाराची संधी देण्यात येईल |
| २ | बँकिंग व अकौंटिंग | बिझनेस कॉर्स्पोंड्ंट | पदवीधर | ४ महीने ( ४५० तास ) ( २ महीने क्लासरुम ट्रेनिंग १ महीना ऑनजॉब ट्रेनिंग ) | १६५३८ | २९७७ | १९५१५ | १७५६३ | |
| ३ | इन्शुरन्स | इन्शुरन्स सेल्स (सेल्स आॅपरेशन्स) | १२ वी पास | ३ महीने ( ३२० तास ) ( २ महीने क्लासरुम ट्रेनिंग १ महीना ऑनजॉब ट्रेनिंग ) | १२८६३ | २३१५ | १५१७८ | १३६६१ | |
| ४ | फॅशन डिझाईन | अॅपरल डिझाईन व मेकिंग | | दीड महीना (120 तास ) | ५५०० | ९९० | ६४९० | ५८४१ | या कोर्सना प्रवेश घेतलेल्या उमेदवाराना स्वयंरोजगाराचे मार्गदर्शन करण्यात येईल |
| ५ | आर्ट ज्वेलरी | ज्वेलरी डिझाईन (कॉस्चुम व ब्रायडल ज्वेलरी | | एक महीना (75 तास ) | ३३५० | ६०३ | ३९५३ | ३५५८ | |
| ६ | ब्यूटीकेअर व हेअरड्रेसिंग | ब्युटी थिअरपिस्ट | | १ महिना (75 तास ) | ३३५० | ६०३ | ३९५३ | ३५५८ | |
| ७ | | हर्बल प्रॉडक्ट मेकिंग | | १५ दिवस (40 तास ) | १६९० | ४०३ | १९९४ | १७९५ | |
| ८ | | हेयर स्टायलिस्ट | | १ महिना (75 तास ) | ३३५० | ६०३ | ३९५३ | ३५५८ | |

टीप: 1. अनुक्रमांक 1 ते 3 अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना रोजगाराची संधी दिली जाईल तर अनुक्रमांक 4 ते 8 अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना त्यांनी स्वयंरोजगार करावा यासाठी संपूर्ण मार्गदर्शन करण्यात येईल. मात्र स्वयंरोजगार सुरू करणे हे उमेदवाराच्या इच्छेवर अवलंबून असेल

2. अनुक्रमांक 1 ते 3 अभ्यासक्रम संस्थेने सामंजस्य करार केलेल्या कौशल्य केंद्रात होतील. या केंद्रात बायोमेट्रिक हजेरी ठेवली जाईल.

3. अनुक्रमांक 4 ते 8 अभ्यासक्रम वस्तीपातळीवर राबविण्यात येणार असल्यामुळे उमेदवारांची हजेरी रजिस्टरवर घेण्यात येईल.

B.P. Bhuge